ISSN 2277-8063 (Print)
Special Issue – May 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF IIJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22. | History | Patriotic Songs – An Inspiration for Indian Freedom Movement | Dr. Mrs. Madhura Rajesh Karande | 80-83 |
| 23. | समाजशास्त्र | स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचे योगदान | डॉ. कन्नाडे ममता कार्तिक | 84-87 |
| 24. | इतिहास | कामगार चळवळीतील अण्णाभाऊ साठे यांचे योगदान | डॉ . निकम राजश्री दिलीप | 88-90 |
| 25. | राज्यशास्त्र | लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्याविषयक विचार | डॉ. वंदना अरूण सातपुते | 91-94 |
| 26. | समाजकार्य | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व भटके विमुक्त | डॉ. विजय जयसिंग माने | 95-99 |
| 27. | राज्यशास्त्र | स्वातंत्र्य चळवळ आणि स्वातंत्र्यसैनिक वसंतदादा पाटील | डॉ. सौ. श्रध्दा विनोद कोठावळे | 100-103 |
| 28. | इतिहास | चिंचणे (ता. चंदगड) : गांधी विचार आणि स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव आणि परिणाम | डॉ. सौ. वैशाली अभिजीत सारंग | 104-107 |
| 29. | इतिहास | दलित पँथर : दलित अस्मितेची चळवळ | डॉ. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव | 108-113 |
| 30. | Economics | A Study on Movement of Working Class People in India | Dr. Santosh Barale | 114-116 |
| 31. | राज्यशास्त्र | आद्यक्रांतीवीर उमाजी नाईकांचा राजकीय स्वातंत्र्यलढा | प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने | 117-120 |
| 32. | इतिहास | सविनय कायदेभंग चळवळ आणि महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह : एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. संदिप भैरू जाधव | 121-125 |
| 33. | मराठी | शांताबाई दाणी यांचे चळवळीतील योगदान | प्रो. डॉ. सिंधू जयवंत आवळे | 126-128 |
| 34. | इतिहास | हुपरी- रेंदाळ परिसरातील स्वातंत्र्य आंदोलन | प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले | 129-131 |
| 35. | राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीमधील आण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान | श्री. तेजस दिलीप कुदळे | 132-134 |
| 36. | राज्यशास्त्र | जयप्रकाश नारायण यांच्या लोकशाही विचारांची समकालीन प्रस्तुतता व मर्यादा | प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ | 135-143 |
| 37. | इतिहास | यशोदर्शन फाउंडेशनचे अवयवदान चळवळीमधील कार्य व महत्व | प्रा. प्रशांत कुचेकर | 144-146 |
| 38. | इतिहास | वसंतराव माने यांचे गोवामुक्ती लढ्यातील योगदान | धैर्यशील मारुती जाधव , डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर | 147-149 |
| 39. | इतिहास | सोलापूरातील भटक्या-विमुक्त जमातीच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास | प्रियांका मधुकर गायकवाड | 150-153 |
| 40. | राज्यशास्त्र | स्त्रीवादी चळवळ | सौ. प्रियांका विलास झोळे - पाटील | 154-156 |
| 41. | इतिहास | स्वातंत्र्यसैनिक सखाराम दादा पाटील: जीवन व कार्य | प्रियांका राजाराम पाटील | 157-160 |
| 42. | इतिहास | गांधीजींचे अहिंसेविषयक विचार : एक अभ्यास | मनोहर सुभाष निकम | 161-164 |
| 43. | इतिहास | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जातनिर्मूलनविषयक विचार व कार्य | डॉ. रामचंद्र वसंत कुंभार | 165-169 |
| 44. | History | JRD Tata a Visionary Nation Builder | Waghmare Kabirdas Sudam | 170-174 |

# दलित पँथर : दलित अस्मितेची चळवळ

**डॉ. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले.
sanghmitra99@gmail.com

---

आंबेडकरी तत्त्वज्ञानाची बैठक बुद्ध, कबीर, फुले, शाहू व आंबेडकर या वैचारिक परंपरेवर आधारलेली आहे. ही वैचारिक परंपरा केवळ दलितच नाही तर समग्र बहुजनांच्या परिवर्तनाचा जाहीरनामा मांडते. म्हणजेच, दलित, शोषित, सर्व जातीय, सर्व धर्मीय स्त्रिया व बहुसंख्य समाजाच्या विकासाची दिशा या विचारसरणीत मांडली आहे. देशातील तत्कालीन ब्रिटिश राजवटीच्या आगमनाने दलित चळवळीच्या उभारणीसाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार केली गेली. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या प्रश्नांवर सखोल संशोधन करून व त्याची मिमांसा करून त्यांनी समतेसाठी लढे उभे केले. दारिद्र्य आणि सर्व प्रकारच्या गुलामगिरीने गांजलेल्या या समाजाला उन्नतीचा मार्ग गवसला.

भारताला स्वातंत्र्य मिळून नवी राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. त्यानुसार भारतीय राज्य घटनेने कागदोपत्री सर्वांना समान अधिकार बहाल केले. परंतु, राज्यघटनेने प्रदान केलेले स्वातंत्र्य, नागरिक हक्क व समानतेची संधी दलितांना नाकारण्यात येत होती. राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट केली असली तरी समाजामध्ये अजूनही अस्पृश्यतेची वागणूक त्यांना मिळत होती. चातुर्वर्ण्य व्यवस्था व तिच्यातून निघालेल्या रूढी परंपरेचा प्रभाव भारतीय उच्च वर्णियांवर होता आणि आजही काही प्रमाणात तो दिसतो आहे. हा भेदाभेद नष्ट करून दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी दलित पँथरची चळवळ उदयास आली.

1970 च्या दशकात अमेरिकेतल्या कृष्णवर्णीय लोकांनी मार्टिन लुथरच्या अहिंसात्मक मार्गाने गेलो तर आपल्याला सहज न्याय मिळणार नाही. त्यामुळे क्रांतिकारक संघटनाच आपल्याला न्याय मिळवून देईल या हेतूने ह्यूवी न्यूटन व बॉबी सील या दोन शिलेदारांनी कॅलिफोर्नियात ब्लॅक पँथरची स्थापना केली होती. याच धरतीवर भारतामध्ये दलित पँथरची सुरुवात झाली.[1]

थोडक्यात, 'टिट फॉर टॅट' म्हणत, 'दलितांवर अत्याचार घडेल तिथंच उत्तर द्यायचं', अशा आक्रमक ध्येयानं पछाडलेल्या बंडखोर तरुणांनी दलित पँथरची स्थापना केली, त्याला नूकतीच 50 वर्षे पूर्ण झाली आहेत.

**उद्देश्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ताकद घेऊन दलितांमध्ये आत्मविश्वास आणि सामर्थ्य निर्माण करणाऱ्या या जहाल विचारसरणीच्या दलित पँथरच्या कार्याचे महत्व अधोरेखित करणे.

दलित पँथरची चळवळ उदयास येण्यास खालील घटना कारणीभूत ठरल्या.

**इंदापूर बावडा प्रकरण :**

नामदेव ढसाळ, राजा ढाले हे 'दलित पँथर'च्या चळवळीचे संस्थापक होत! ढसाळ हे सुरुवातीला कामगार व शोषित लोकांसाठी काम करणाऱ्या जॉर्ज फर्नांडिस यांच्या पक्षात काम करत होते. या पक्षामधले ज्यादा तर लोक मागासवर्गाशी संबंधित असतानाही इंदापूर-बावड्याच्या प्रकरणात पक्षप्रमुखांनी लक्ष न घातल्याने नामदेव ढसाळ अस्वस्थ होते. इंदापूर बावडा प्रकरण म्हणजे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात बावडा या गावी स्पृश्यांनी अस्पृश्यांवर घातलेला बहिष्कार होय! महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळातील सदस्य शंकरराव पाटील यांचे बंधू शहाजीराव पाटील यांनी हा बहिष्कार घातला होता आणि सरकार त्यांच्यावर कोणतीही कारवाई करत नव्हते. या प्रकरणात राज्यमंत्री असलेले शंकरराव पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी लोकांनी मागणी केली. दलित युवक आघाडी, युक्रांद व समाजवादी युवक सभेच्या कार्यकर्त्यांनी शंकराव पाटील यांचा राजीनामा मागीतला. दलितांवर असे अनेक प्रकारचे अन्याय होत होते.[2]

**एलिया पेरूमल कमिटी :** सन 1965 साली दलितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविण्यासाठी ही कमिटी नेमली होती. या कमिटीने 1970 साली आपला रिपोर्ट संसदेसमोर ठेवला. या अहवालात वर्षात 1,177 दलितांचे खून नोंदविण्यात आले होते. पण प्रत्यक्षात ही संख्या कित्येक पटीने अधिक होती.[3]

**रिपब्लिकन पक्षातील फुट :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर त्यांच्या कल्पनेतील रिपब्लिकन पक्षाला फुटीचे ग्रहण लागल्यामुळे आंबेडकरी चळवळ थांबल्यासारखी झाली व दुसऱ्या बाजूला दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत गेले. इ.स. 1970नंतर रिपब्लिकन पक्षाने रस्त्यावरचे जन-सामान्यांचे प्रश्न घेऊन लढण्याऐवजी राखीव जागा, सवलती या सुरक्षित प्रश्नांवरच काम करू लागल्याने पक्षाचा जन-सामान्यांवरचा प्रभाव कमी झाला. दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांच्यावर गावो गावी टाकले जाणारे बहिष्कार, एलिया पेरूमल समितीने दलितांवर होणारे अन्याय-अत्याचारांची दिलेली आकडेवारी अशा कारणांमुळे दि. 9 जुलै 1972 रोजी दलित पँथरची स्थापना झाली. 'सम्यक क्रांती आमचा संकल्प' हा त्यांचा नारा होता. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वि. पवार हे प्रभृती लेखक लढाऊ व आक्रमक भूमिका घेऊन सामाजिक व राजकीय मैदानात उतरले होते. सवलतींच्या व निवडणुकांच्या नेभळट राजकारणाला तसेच, हिंदूमधील पुनरुज्जीवनवादी शक्तींना स्पष्ट विरोध करून सर्वांगीण क्रांतीची जहाल भाषा हे तरुण उच्चारत होते. थोडक्यात, भारतीय समाज व्यवस्थेमध्ये दलितांना मिळालेल्या अमानुष वागणुकीतून व संतापातून दलित पँथरची चळवळ उभी राहिली. पँथरच्या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे या चळवळीसाठी पुढारी किंवा कार्यकर्त्यांचा शोध घ्यावा लागला नाही. कारण ही चळवळ लोकाधिष्ठित असल्याने पुढारी आपोआपच मिळत गेले.[4]

एलिया पेरूमल कमिटी रिपोर्टनुसार दलित स्त्रियांवर बलात्कार, त्यांची नग्न धिंड काढणे, दलितांवर बहिष्कार टाकणे, त्यांच्या पाणवठ्यात विष्ठा टाकणे असे अनेक गुन्हे होऊनही त्याची नोंद घेतली जात नव्हती. या अहवालानंतरही सरकार मूक गिळून गप्प होते. या संपूर्ण घटनेतून आंबेडकरी जनतेमध्ये एक क्रांतीची ठिणगी पडणार असे चित्र होते. दलित साहित्यिक दलितांवरील या अत्याचाराने अस्वस्थ झाले होते. दलितांवरील हे अन्याय नाही थांबले तर दलितांमध्ये क्रांतीची बंडाळी होण्याची भाषा साहित्यातूनही केली जात होती. या काळात दलित साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. त्यातून दलित समाजामध्ये नव्या सामाजिक व राजकीय जाणिवा व्यक्त होत गेल्या. या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात एखादी जहाल संघटना उभी करण्याच्या विचारातून ज. वि. पवार आणि नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची स्थापना केली. पँथरचा जन्म हा जसा इथल्या विषम व्यवस्थेविरूद्ध विद्रोह होता.[5] सन 1970 मध्ये महाराष्ट्रात दलित पँथरची चळवळ सुरू झाली. नंतर ही चळवळ गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये पसरली.[6]

**दलित पँथर : व्याख्या**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी चळवळीचे आक्रमक व समर्थपणे नेतृत्व करणारी जहाल विचार घेऊन युवकांनी उभारलेली आक्रमक चळवळ म्हणजे दलित पँथर होय![7]

**दलित पँथरच्या जाहीरनामा व त्यांचा कार्यक्रम :**

दलित पँथरच्या जाहीरनाम्यात त्यांचा कार्यक्रम आढळतो. दलित किसानांच्या जमिनीच्या प्रश्नांना हात घातलाच पाहिजे, खेड्यातील सरंजामशाही पद्धतीचे अवशेष दलितांची छळवणूक करून अत्याचार करतात या सर्व गोष्टींचा अंत व्हायला हवा, भूमिहीन शेतकऱ्यांच्या कमाल जमीन धारणा कायद्यातून उपलब्ध होणाऱ्या जमिनीचे वाटप केले पाहिजे, वेशी बाहेरच्या वस्त्या गावकुलात आणल्या पाहिजेत, सर्व उत्पादनाची साधने दलितांच्या मालकीची झाली पाहिजेत, सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक शोषण नष्ट करून भारतात समाजवाद आणला पाहिजे, केवळ राष्ट्रीयीकरणाने भागणार नाही. सर्व दलितांना रोजगार हमी मिळाली पाहिजे, बेकार दलीतांना बेकार भत्ता मिळाला पाहिजे, सर्व दलितांना मोफत शिक्षण, औषधोपचाराची सोय, निवारा, स्वस्त धान्य मिळाले पाहिजे. देवस्थानचे अनुदान बंद करून त्यांची संपत्ती जप्त करून दलितांसाठी वापरण्यात आली पाहिजे. धार्मिक आणि

**एलिया पेरूमल कमिटी :** सन 1965 साली दलितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविण्यासाठी ही कमिटी नेमली होती. या कमिटीने 1970 साली आपला रिपोर्ट संसदेसमोर ठेवला. या अहवालात वर्षात 1,177 दलितांचे खून नोंदविण्यात आले होते. पण प्रत्यक्षात ही संख्या कित्येक पटीने अधिक होती.[3]

**रिपब्लिकन पक्षातील फुट :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर त्यांच्या कल्पनेतील रिपब्लिकन पक्षाला फुटीचे ग्रहण लागल्यामुळे आंबेडकरी चळवळ थांबल्यासारखी झाली व दुसऱ्या बाजूला दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत गेले. इ.स. 1970नंतर रिपब्लिकन पक्षाने रस्त्यावरचे जन-सामान्यांचे प्रश्न घेऊन लढण्याऐवजी राखीव जागा, सवलती या सुरक्षित प्रश्नांवरच काम करू लागल्याने पक्षाचा जन-सामान्यांवरचा प्रभाव कमी झाला. दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांच्यावर गावो गावी टाकले जाणारे बहिष्कार, एलिया पेरूमल समितीने दलितांवर होणारे अन्याय-अत्याचारांची दिलेली आकडेवारी अशा कारणांमुळे दि. 9 जुलै 1972 रोजी दलित पँथरची स्थापना झाली. 'सम्यक क्रांती आमचा संकल्प' हा त्यांचा नारा होता. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वि. पवार हे प्रभृती लेखक लढाऊ व आक्रमक भूमिका घेऊन सामाजिक व राजकीय मैदानात उतरले होते. सवलतींच्या व निवडणुकांच्या नेभळट राजकारणाला तसेच, हिंदूमधील पुनरुज्जीवनवादी शक्तींना स्पष्ट विरोध करून सर्वांगीण क्रांतीची जहाल भाषा हे तरुण उच्चारत होते. थोडक्यात, भारतीय समाज व्यवस्थेमध्ये दलितांना मिळालेल्या अमानुष वागणुकीतून व संतापातून दलित पँथरची चळवळ उभी राहिली. पँथरच्या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे या चळवळीसाठी पुढारी किंवा कार्यकर्त्यांचा शोध घ्यावा लागला नाही. कारण ही चळवळ लोकाधिष्ठित असल्याने पुढारी आपोआपच मिळत गेले.[4]

एलिया पेरूमल कमिटी रिपोर्टनुसार दलित स्त्रियांवर बलात्कार, त्यांची नग्न धिंड काढणे, दलितांवर बहिष्कार टाकणे, त्यांच्या पाणवठ्यात विष्ठा टाकणे असे अनेक गुन्हे होऊनही त्याची नोंद घेतली जात नव्हती. या अहवालानंतरही सरकार मूक गिळून गप्प होते. या संपूर्ण घटनेतून आंबेडकरी जनतेमध्ये एक क्रांतीची ठिणगी पडणार असे चित्र होते. दलित साहित्यिक दलितांवरील या अत्याचाराने अस्वस्थ झाले होते. दलितांवरील हे अन्याय नाही थांबले तर दलितांमध्ये क्रांतीची बंडाळी होण्याची भाषा साहित्यातूनही केली जात होती. या काळात दलित साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. त्यातून दलित समाजामध्ये नव्या सामाजिक व राजकीय जाणिवा व्यक्त होत गेल्या. या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात एखादी जहाल संघटना उभी करण्याच्या विचारातून ज. वि. पवार आणि नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची स्थापना केली. पँथरचा जन्म हा जसा इथल्या विषम व्यवस्थेविरूद्ध विद्रोह होता.[5] सन 1970 मध्ये महाराष्ट्रात दलित पँथरची चळवळ सुरू झाली. नंतर ही चळवळ गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये पसरली.[6]

**दलित पँथर : व्याख्या**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी चळवळीचे आक्रमक व समर्थपणे नेतृत्व करणारी जहाल विचार घेऊन युवकांनी उभारलेली आक्रमक चळवळ म्हणजे दलित पँथर होय![7]

**दलित पँथरच्या जाहीरनामा व त्यांचा कार्यक्रम :**

दलित पँथरच्या जाहीरनाम्यात त्यांचा कार्यक्रम आढळतो. दलित किसानांच्या जमिनीच्या प्रश्नांना हात घातलाच पाहिजे, खेड्यातील सरंजामशाही पद्धतीचे अवशेष दलितांची छळवणूक करून अत्याचार करतात या सर्व गोष्टींचा अंत व्हायला हवा, भूमिहीन शेतकऱ्यांच्या कमाल जमीन धारणा कायद्यातून उपलब्ध होणाऱ्या जमिनीचे वाटप केले पाहिजे, वेशी बाहेरच्या वस्त्या गावकुलात आणल्या पाहिजेत, सर्व उत्पादनाची साधने दलितांच्या मालकीची झाली पाहिजेत, सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक शोषण नष्ट करून भारतात समाजवाद आणला पाहिजे, केवळ राष्ट्रीयीकरणाने भागणार नाही. सर्व दलितांना रोजगार हमी मिळाली पाहिजे, बेकार दलीतांना बेकार भत्ता मिळाला पाहिजे, सर्व दलितांना मोफत शिक्षण, औषधोपचाराची सोय, निवारा, स्वस्त धान्य मिळाले पाहिजे. देवस्थानचे अनुदान बंद करून त्यांची संपत्ती जप्त करून दलितांसाठी वापरण्यात आली पाहिजे. धार्मिक आणि

जातीय वाङ्मयावर बंदी आणली पाहिजे, जातवार पाडण्यात आलेल्या सैन्याची रचना रद्द केली पाहिजे, काळाबाजार करणारी साठेबाज सावकार आणि जनतेच्या आर्थिक शोषण करण्याचा नायनाट केला पाहिजे, जीवनोपयोगी वस्तूंचे भाव उत्तरलेच पाहिजे हा दलित पँथरचा जाहीरनामा होता. दलित पँथरच्या या कार्यक्रमाचा फार वेगाने राज्यभर प्रसार झाला आणि दलितांना जी बाबासाहेबांच्या निधनानंतर मळगळ आली होती, ती गेली.

मराठी साहित्याच्या क्षेत्रातही दलित लेखक आणि लेखिकांनी वास्तववादी लिखाण करून दलितांचे प्रश्न मांडण्यात आणि दलितांच्या चळवळीला पुढे नेण्यात महत्त्वाचे योगदान दिलेली दिसते.[8] दलित पँथरच्या स्थापनेत नामदेव ढसाळ, राजा ढाले, रवी पवार, भाई संगारे,अरुण कांबळे, रामदास आठवले, लतीफ खाटीक, अविनाश महातेकर, इत्यादींचा महत्त्वाचा वाटा होता.

**दलित पँथरने 'दलितां'ची केलेली व्याख्या :**

दलित कोण? असा प्रश्न विचारून त्यांनी अनुसूचित जाती जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी, इत्यादिंचा समावेश असलेली दलितांची व्यापक व्याख्या केली.[9]

**दलित पँथरची कार्यपद्धती :**

दलित समाजाविषयी आपार जिव्हाळा, सामाजिक विषमते विरुद्ध बंड, या विषमतेवर बेदरकार भाषणातून प्रहार करणे, विचार वादळी सभा, प्रचंड मोर्चे, हाणामाऱ्या, यातून होणाऱ्या पोलीस केसेस यामुळे दलित पँथर नावारूपाला आली. या पँथरच्या वैशिष्ट्यामुळेच या संघटनेने सर्व समाजाचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले.[10]

राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, रामदास सोरटे, लतिफ खाटीक, अविनाश महातेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे, एम. एस. प्रधान, आदी नेत्यांनी चळवळ जोपासली. 'विद्रोह' हे दलित पँथरचे मुखपत्र होते. ते नामदेव ढसाळ, ज. वि. पवार चालवत असत. यात पँथरची जहाल भूमिका मांडलेली असायची. दलित समाजाविषयी अपार जिव्हाळा आणि सामाजिक विषमतेविरुद्ध अन्याय, अत्याचाराविरुद्ध पराकोटीची चीड असलेले विशी-पंचविशीतील तरुण पोरं ही दलित पँथरची खरी ताकद होती. वरळीची दंगल, भगवद्‌गीतेचे दहन, शंकराचार्यांना जोडा मारणे, शिवसेनेबरोबर झालेल्या मारामाऱ्या यांमुळे पँथरचा शहरी व ग्रामीण भागावर दरारा निर्माण झाला.[11]

**राजा ढाले यांचा साधना साप्ताहिकात लिहिलेला लेख :**

इ.स. 1972 साली भारतीय स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवाचा दिवस होता. पण पँथरने तो 'काळा दिवस' म्हणून पाळला. पँथरचे नेते राजा ढाले यांनी 'साधना' या साप्ताहिकातून एक लेख लिहून एकच खळबळ उडवली. साधनेतील लेखात राजा ढाले लिहितात, "लोकांची सहानुभूती मिळवण्यासाठी स्वतःला दलित म्हणून घेणे वेगळे आणि प्रत्यक्षात दलित, उपेक्षित म्हणून जगणे व लढ्याला सामोरे जाणे वेगळे. ब्राह्मणाच्या बाईचा कासोटा गावात सोडला जात नाही. सोडला जातो तो बौद्ध स्त्रीचा नि याला शिक्षा काय तर 50 रुपये दंडाची! राष्ट्रध्वजाचा अपमान केला तर 300 रुपये दंड! राष्ट्रध्वज म्हणजे निव्वळ कापड, विशिष्ट रंगात रंगवलेले प्रतीक! या प्रतीकाचा अपमान झाला तर दंड नि सोन्या गावच्या सोन्यासारख्या प्रत्यक्षातील चालत्याबोलत्या स्त्रीचे पातळ फेडले तर 50 रुपये दंड !" याच लेखात ते पुढे म्हणतात, "लोकांचे दुःख मोठे की प्रतीकाच्या अपमानाचे दुःख मोठे? कोडं काय? आमच्या अब्रूची किंमत एका पातळाच्या किंमती एवढी! या गुन्ह्यात म्हणूनच राष्ट्रध्वजाच्या अपमानाला होणाऱ्या दंडापेक्षा जबर शिक्षा हवी. न पेक्षा लोकांत राष्ट्र प्रेम राहणार आहे काय ?[12]

**वरळीची दंगल :**

दि. 5 जानेवारी 1974 रोजी वरळीच्या आंबेडकर मैदानावर पँथरची जाहिर सभा होती. या सभे दरम्यान मोठी दंगल झाली. राजा ढाले, नामदेव ढसाळ, भाई संगारे, लतिफ खाटीक, ज. वि. पवार या व इतर पँथर नेत्यांना अटक झाली. त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्यात आले. या दंगलीत सवर्ण व पोलीस यंत्रणा यांच्याकडून अत्याचार झाले. या दंगलीविषयी प्रा. अरुण कांबळे यांनी असे मत मांडले की, 'दलित पँथर' या चळवळीचे लढाऊ आणि आक्रमक स्वरूप लोकांच्या पुढे आले ते वरळी दंगलीमुळे ! वरळी येथील दंगल दलित पँथर व शिवसेना

यांच्यात झाली. या वेळी डाव्या शक्ती पँथरच्या पाठीशी होत्या. भागवत जाधव व रमेश देवसवकर यांच्या आत्मबलिदानातून ही संघटना उभी राहिली. या दंगलीमुळे दलित तरुणांना आपल्या प्रतिकारक्षमतेची जाणीव झाली.[13]

कोठेही अन्याय, अत्याचार झाल्याची बातमी मिळताच तिथे पँथर्स धडकायचे. सभा घेऊन अत्याचार करणाऱ्यांचा निषेध करायचे व पीडितांना आधार द्यायचे.

**दलित पँथरमधील फूट :**

शेवटी, राजा ढाले व नामदेव ढसाळ यांच्यात तात्त्विक मतभेद होऊन दलित पँथरचे विघटन झाले. बुद्धवजा आंबेडकर असा दलित शोषितांचा, कष्टकऱ्यांचा लढा उभारला पाहिजे, अशी नामदेव ढसाळांची भूमिका होती. तर दलित पँथर बुद्ध तत्त्वप्रणालीप्रमाणे चालवली पाहिजे, असा राजा ढाले यांचा आग्रह होता. नागपूर येथे भरलेल्या पहिल्याच अधिवेशनात राजा ढाले यांनी नामदेव ढसाळांना पँथरमधून काढून टाकले. पुढे राजा ढाले यांनी दलित पँथर ही संघटनाच बरखास्त करून 'मास मूव्हमेंट' ही संघटना स्थापन केली.

पुढे काही काळानंतर इ.स. 1977 साली भाई संगारे, अरुण कांबळे, रामदास आठवले, दयानंद म्हस्के, रमेशचंद्र परमार, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर आणि एम. एस. प्रधान आदींनी 'भारतीय दलित पँथर' या नावाने पँथरची पुनर्बांधणी केली. या संघटनेचे पहिले अध्यक्ष अरुण कांबळे हे होते. तर दुसरे अध्यक्ष गंगाधर गाडे व तिसरे अध्यक्ष रामदास आठवले होते.[14]

रामदास आठवले, गंगाधर गाडे, अरुण कांबळे या प्रभृतींनी या चळवळीच्या कक्षा बऱ्याच विस्तारल्या. रोजगार हमी योजनेच्या प्रकल्पात काम करणारे दलित, कामगार व भूमिहीन शेतमजूर यांच्या प्रश्नांना ते हात घालीत असत. नामांतराचा प्रश्नही त्यांनी या चळवळीच्या माध्यमातून धसास लावला. लोकांची कामे करून त्यांच्या उपयोगी पडणे, आर्थिक योजना हाती घेऊन कार्यकर्त्यांच्या योगक्षेमाची करणे, चळवळीची मजबूत आर्थिक पायावर उभारणी करणे, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक आघाड्यांवर रणनीती नीट ठरवून आगेकूच करणे या काही जमेच्या बाजू दलित पँथरबाबत सांगता येतील.[15]

नामांतर व रिडल्स प्रश्नांत पँथर अग्रभागी होती. तर मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी यासाठी पँथरने इ.स. 1982 मध्ये महाराष्ट्रात मुंबई येथे पहिली परिषद घेतली. दलित पँथरचा महिला कक्ष नुसता नावा पुरताच होता. त्याचे स्वतंत्र असे फारशे काम चालू नव्हते.

**दलित पँथर व नामांतराचा लढा :**

नामांतराच्या लढ्यात दलित पँथरची महत्त्वपूर्ण भूमिका होती. दलित पँथरच्या फुटीनंतर पुनर्बांधणी करून दलित पँथरने नामांतर लढ्याचा महत्त्वाचा कृती कार्यक्रम हाती घेतला होता. गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यात नामांतर आंदोलनाने चांगली मुसंडी मारली होती. सन 1978 च्या स्वातंत्र्य दिनाला मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातून मोर्चे काढले गेले. रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेवगावकर, प्रा. अरुण कांबळे इत्यादी नेत्यांनी संपूर्ण मराठवाड्यात दौरे करून नामांतर लढ्यास अनुकूल वातावरण केले. पँथर हा लढा केवळ मराठवाड्याचा अथवा महाराष्ट्रा पुरता मर्यादित न ठेवता तो संपूर्ण देशांमध्ये पसरवण्याचे काम केले. कारण हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवाचा आणि आंबेडकरी जनतेच्या अस्मितेचा प्रश्न होता. जुलै 1979 मध्ये विधान भवनावर प्रचंड मोर्चा काढला व ऑगस्ट मध्ये पँथरच्या या कार्यकर्त्यांनी विधान सभेच्या प्रेक्षक गॅलरीतून खाली उडी मारून नामांतरास पाठिंबा देण्याच्या घोषणा केल्या. नामांतरासाठी अशी वेगवेगळ्या प्रकारे आंदोलने होत होती. 6 डिसेंबर 1979 ला औरंगाबाद मध्येही दलित पँथरचे गंगाधर गाडे आणि माईसाहेब सविता आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन केले होते. औरंगाबाद येथील भडकल गेट ते कलेक्टर कचेरीवर निघालेल्या मोर्चाला क्रांती चौकात पोलिसांनी अडवल्यानंतर माईसाहेबांसह हजारो कार्यकर्त्यांनी स्वतःला अटक करून घेतली. या सर्वांची रवानगी हरसुल जेलमध्ये करण्यात केली होती. परंतु, हा जेल भरून गेला आणि जागा कमी पडल्याने नंतर पोलिसांनी कार्यकर्त्यांना सोडून दिले. सतत मोर्चे निदर्शने, धरणे अशा प्रकारचे कार्यक्रम त्यांनी सुरूच ठेवले.

अगदी नामांतराची घोषणा होईपर्यंत नामांतर चळवळ जिवंत ठेवण्याचे कार्य दलित पँथरसह सर्व नामांतरवादी संघटनांनी केले.

नामांतराचा निर्णय होत नाही म्हणून नांदेडचे पँथरचे कार्यकर्ते गौतम वाघमारे यांनी 25 सप्टेंबर 1993 ला आत्मदहन केले. 20 डिसेंबर 1993 मध्ये प्रतिभा तायडे यांनी आत्मदहन केले. रामदास आठवलेंनी 14 एप्रिल 1994 पर्यंत नामांतर न झाल्यास आपला राजीनामा देण्याचा दबाव मुख्यमंत्री शरद पवारांवर टाकला होता.[16]

**दलित पँथर व रिडल्स लढा :**

2 ऑक्टोबर 1987 रोजी नागपूर येथे महाराष्ट्र शासनाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस' हा खंड प्रकाशित केला. या चौथ्या इंग्रजी खंडामध्ये डॉ. बाबासाहेब यांच्या 'रिडल्स इन हिंदूइझम' या ग्रंथामधील 'रिडल्स ऑफ रामा ॲण्ड कृष्णा' हे परिशिष्ट आहे. हे लिखाण म्हणजे हिंदू देव देवता आणि धर्मशास्त्र यांच्यावरील संशोधनपर लिखाण आहे. परंतु, या लिखाणामुळे महाराष्ट्रात मोठे वादळ निर्माण झाले. यालाच 'रिडल्सचा लढा' असे म्हणतात. या लढ्यामध्येही दलित पँथरने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या संदर्भात डॉ. य. दि. फडके सारख्या दलितेतर विचारवंतांनी म्हटले की, ग्रंथाची होळी पेटवून शिवीगाळ करून अथवा मोर्चाने हा वाद मिटवता येणार नाही. तर विचारांचा मुकाबला विचारानेच केला पाहिजे.' या प्रसंगी, मुंबईत नामदेव ढसाळ, राजा ढाले, अरुण कांबळे, चंद्रकांत हांडोरे, अविनाश महातेकर, इत्यादी मंडळीनी प्रचंड मोठा मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. औरंगाबाद येथे मुख्यमंत्र्याच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. या प्रसंगी पँथरच्या अनेक कार्यकर्त्यांना या वेळी अटक करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी, मास मुव्हमेंट, दलित सेना, समता सैनिक दल या दलित संघटनाच्या सोबत दलित पँथरनेही 'रिडल्स'च्या प्रश्नात संपूर्ण ताकदीनिशी आपले योगदान दिले.[17]

**दलित पँथर व मंडल आयोग लढा :**

भारत सरकारने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 340 नुसार 'बॅकवर्ड क्लास कमिशन' 1 जानेवारी 1979 रोजी नेमले होते. या कमिशनने आपला अहवाल तयार केला होता. पण इंदिरा गांधी सरकार व नंतरच्या राजीव गांधी सरकारने त्याचा विचार करण्यास नकार दिला. दहा वर्षानंतर व्हि. पी. सिंग सरकारने लागू केला. यालाच 'मंडल आयोग' असेही म्हणतात. या आयोगाच्या अंमलबजावणीसाठी सन 1982 मध्ये महाराष्ट्रातील पहिली परिषद भारतीय दलित पँथरने वडाळा, मुंबई येथे घेतली. पाठोपाठ ठाणे, धुळे जिल्ह्यातील विटाई, कोल्हापूर, इत्यादी ठिकाणी परिषदा झाल्या. नामांतराचा प्रश्न मंडल आयोगाशी जोडून 'नामांतर-मंडल आयोग संयुक्त परिषदा' पार पडल्या. पँथर नेते अरुण कांबळे यांनी पुण्याला झालेल्या मंडल आयोग परिषदेत समतेचा लढा हा भांडवलशाही व ब्राह्मण शाही या दोहों विरुद्ध एकाच वेळी आहे, हे डॉ. आंबेडकरांचे सूत्र प्रभावीपणे मांडले. पुढे ते जनता दलाचे देश पातळीवर सेक्रेटरी झाले.[18]

दलित पँथर सार्वत्रिक निवडणुकात स्पष्ट राजकीय धोरण घेऊ न शकल्याने कधी काँग्रेसला पाठिंबा तर कधी स्थानिक पातळीवर भाजप सोडून कोणत्याही मध्यम मार्गी पक्षाशी दोस्ती असा हेलकावे खात राहिला. मंडल आयोगाला थोपवण्यासाठी सन 1989 मध्ये भाजपने अडवाणीच्या नेतृत्वाखाली काढलेल्या राम रथ यात्रेने देशातील वातावरण तंग बनले. सेक्युलॅरिझमच्या प्रश्नावर रामदास आठवले यांनी काँग्रेसशी आघाडी केली आणि 1991 या वर्षी झालेल्या रिपब्लिकन पक्ष ऐक्यात दलित पँथर विसर्जित झाली.[19]

**निष्कर्ष :**

या चळवळीमुळे दलितांना जातिभेदा विरूद्ध आणि दैनंदिन जीवनातील सामाजिक, आर्थिक, अन्याया विरूद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण झाली. या चळवळीने देशभरातली दलितांना आपले हक्क आणि प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी संघटित केले. आत्म प्रतिष्ठेच्या रक्षणासाठीचे लढे उभे राहिले.

आपल्यावर अन्याय होत आहे आता आपणच प्रतिकार केला पाहिजे असा प्रचार दलित वस्त्या-वस्त्यांमधून पोट तिडिकेने सुरू झाला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिंदाबाद'च्या घोषणा देत या भीमशक्तीच्या कॉर्नर सभा सुरू झाल्या. अशा तऱ्हेने रिपब्लिकन पक्षाच्या मरगळीतून दलित चळवळ बाहेर पडली. दलित पँथर ही

संघटना ही चळवळ केवळ एक जहाल संघटना नसून ती प्रगल्भ आंबेडकरी विचारधारेचे वैचारिक अधिष्ठान असलेल्या बुद्धिवादी साहित्यिकांनी सुरू केलेली विधायक अशी चळवळ होती.

**संदर्भ :**


1.कांबळे मच्छिंद्र, आंबेडकरी चळवळ प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 2016, पृ. 44.

2.उपरोक्त, पृ. 44.

3.उपरोक्त, पृ. 45.

4.लिंबाळे, शरणकुमार, भारतीय दलित पँथर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, 1992, पृ. 28.

5.कांबळे मच्छिंद्र, आंबेडकरी चळवळ प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 2016, पृ. 45.

6.देवगावकर डॉ. एस. जी., देवगावकर शैलजा, डुंबरे जयमाला, सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, दुसरी आवृत्ती, 2014, पृ. 177.

7.कांबळे डॉ. नारायण, आंबेडकरी चळवळीचे बदलते संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012, पृ. 38.

8.देवगावकर डॉ. एस. जी., देवगावकर शैलजा, डुंबरे जयमाला, सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, 2014, पृ. 178.

9.साळवे दिनकर, 1956 नंतरची दलित चळवळ, दिग्नाक प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, 2001, पृ.14.

10. कांबळे डॉ. नारायण, आंबेडकरी चळवळीचे बदलते संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2012 पृ. 38 व 39.

11. 'अन्विक्षण' त्रैमासिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक, वर्ष पहिले, अंक 4, एप्रिल-जून 2011, पृ. 55.

12. चेंदवणकर, प्रल्हाद, 'पँथरचा जन्म' दलित पँथर, संपादक : लिंबाळे, शरणकुमार, पृ. 37.

13. Jogdand, P. G., Dalit Movement in Maharashtra, Kanak Publications, New Delhi, First Ed., 1991, P. 82, 83.

14. 'अन्विक्षण' त्रैमासिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक, एप्रिल-जून 2011, पृ.57.

15. भोळे, भास्कर लक्ष्मण, संदर्भ दलित चळवळीचा, बजाज पब्लिकेशन, अमरावती, 2008, पृ. 82.

16. कांबळे मच्छिंद्र, आंबेडकर चळवळ, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, 2016, पृ.57

17. उपरोक्त, पृ. 62 व 63

18. साळवे दिनकर, 1956 नंतरची दलित चळवळ, दिग्नाक प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, 2001, पृ. 32

19. उपरोक्त, पृ. 33